# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक १६.१०.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–**

दिनांक १५.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०८ केसेसमध्ये ०८ ईसमावर कारवाई करून एकुण ८१,५७०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०३ केसमध्ये १० ईसमावर कारवाई करून एकुण ९७,४९०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. दिनांक १५.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १६.१०.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०२ ईसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ६४ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ९९ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २४५ केसेस, रॉंग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ९८ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ९० केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०४ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १७३ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०५ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २१ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०७ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ९९८ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे २२ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २२ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,९३७ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ६,८४,०००/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :– रेकॉर्डवरील आरोपीस अटक. वाहनचोरीचे ०२ गुन्हे उघडकीस.**

दिनांक १५.१०.२०२६ चे २१.०० वा. २२.०० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे रेकॉर्डवरील तसेच, गुन्ह्यात पाहीजे व फरार आरोपींचे शोधार्थ पेट्रोलिंग करीत असता, पथकातील पोहवा. अजय शुक्ला व व नितीन वर्मा यांना त्यांचे विश्वसनिय बातमीदारमार्फतीने खात्रीशीर माहिती मिळाली की, रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे अंशुल गजबे हा तहसिल येथे दाखल एका वाहनचोरीचे गुन्ह्यात पाहीजे आरोपी असुन, त्याने ईतर एका ठिकाणी वाहनचोरी केलेली आहे व तो रेल्वे स्टेशन येथे फिरत आहे. अशा माहितीवरून रेल्वे स्टेशन परीसरात त्याचा शोध घेतला असता, तो दिसल्याने त्याचे जवळ जात असता, तो

पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अंशुल नितीन गजबे, वय २४ वर्षे, रा. प्लॉट नं. १९८, एनआयटी गार्डन जवळ, दत्तात्रय नगर, नागपूर असे सांगितले. त्यास विचारपुस केली असता, त्याने पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीत एक वाहनचोरी केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन होंडा ॲक्टीवा मोपेड क्र. एम.एच ३४ ए.क्यु. ८४०३ जप्त करण्यात आली. वाहनाबाबत तसेच गुन्हे अभिलेख तपासला असता, पोलीस ठाणे ईमामवाडा येथे नमुद मोपेड चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे दिसुन आले. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने पोलीस ठाणे तहसिल हद्दीत मेयो हॉस्पीटल परीसरातुन ०१ दुचाकी चोरी करून, झिरो माईल येथुन जात असतांना, रस्त्यात पोलीस दिसल्याने त्याने चोरी केलेले वाहन तेथेच सोडुन दिले होते, जे नंतर राहुल उर्फ छोटा तिवारी नावाचे आरोपीने चोरी केल्याचे सांगीतले. राहुल उर्फ छोटा तिवारी यास यापुर्वीच अटक करण्यात आली आहे. आरोपीकडुन पोलीस ठाणे ईमामवाडा व तहसिल येथील ०२ वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. आरोपी हा गुन्हा घडल्यापासून स्वतःचे अस्तीत्व लपवुन राहील्याने, मिळुन मिळुन येत नव्हता. आरोपीस गुन्हेसंबंधाने अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव ईमामवाडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. पप्पू कादरी, पोहवा. अजय शुक्ला, नितीन वर्मा, सचिन बढीये, राहुल कुसरामे, शंभुसिंग किरार, रोशन तिवारी, विलास कोकाटे व चापोअं. अभय ढोणे यांनी केली.



**<u>३) नविन कामठी पोलीसांची कामगीरी :– घरफोडी करणाऱ्या आरोपींना अटक.</u>**

दिनांक ०६.०५.२०२६ चे ०७.०० वा. ते दिनांक ०८.०५.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीत, प्लॉट नं. १९६, कल्पतरू कॉलोनी, नागपूर येथे राहणारे फिर्यादी नरेंद्र रोमेलसिंग बलोरीया, वय ५६ वर्षे हे त्यांचे घराला कुलूप लावून परिवारासह त्यांचे मुळ गावी नेरटी, जि. कानडा, (हिमाचल प्रदेश) येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराची खिडकी तोडून आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीत ठेवलेले रोख ३०,०००/–रू. तसेच, सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,६६,६००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान नविन कामठी पोलीसांनी तांत्रीक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपींना निष्पन्न केले व आरोपी नामे क्र. १) रितेश उर्फ सोनु सोमनाथ विश्वकर्मा, वय ३१ वर्षे, रा. समतानगर, नारा, कपीलनगर, नागपुर ३) मंगेश रामकिशन डोंगरे, वय ३५ वर्षे, समतानगर, करण बिछायत केंद्राजवळ, कपिलनगर, नागपूर यांना ताब्यात घेतले. गुन्हेसंबंधाने त्यांना विचारपुस केली असता, त्यांनी त्यांचा साथीदार पाहिजे आरोपी नामे रितीक उर्फ दद्या विशाल नागदेवे, वय २७ वर्षे, समतानगर, नारा, नागपूर याचेसह संगणमताने घरफोडी केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन सोन्याची लगड वजनी १७ ग्रॅम, चांदीच्या ०२ पायपट्टी वजनी २५ ग्रॅम, असा एकुण ५५,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. अंकुश खेडकर, सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. महेश आंधळे, पोउपनि. अक्षय झगडे, पोहवा. दिपक चोले, पोअं. नसीम अंसारी, नितेश नवघडे, आकाश टेकाम व विलास चिंचुलकर यांनी केली.




**४) सदर पोलीसांची कामगिरी :– 'स्पा सेंटरचे' नावाखाली देहव्यावसाय करवुन घेणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १५.१०.२०२६ चे १५.४५ वा ते १८.३० वा. चे दरम्यान, मा. पोलीस उपायुक्त श्रीमती अन्नपूर्णा सिंग (परि.क्र. २) यांना अवैध देहव्यवसायाबाबत गोपनिय माहिती प्राप्त झालेवरून, त्यांनी सदर पोलीसांना सुचित केले. सदर पोलीसांचे तपास पथकाने पोलीस ठाणे हद्दीत, मंगळवारी बाजार परिसरातील रेयान टॉवर बिल्डींगमध्ये 'व्हेलीना थाई ॲण्ड हमाम स्पा' सेंटर येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे महिला आरोपी नामे लालपेकमावाई ताईलबाका, वय ३९ वर्षे, रा. ०७८ (२), झिरो पॉईंट साईहा, सिलॉग, जि. साईहा, (मेझोराम) ही स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता पिडीत महिलांना पैशांचे आमिष दाखवून, घटनास्थळी येथे जागा व ग्राहक उपलब्ध करुन देऊन, स्पा सेंटर चे नावाखाली त्यांचेकडून अनैतिक देहव्यापार करवून घेताना समक्ष मिळून आली. घटनास्थळावरून पिडीत ०३ महीलांची सुटका करण्यात आली. आरोपीचे ताब्यातुन रोख ३२,०००/– रु, ग्राहकांकडून पैसे स्विकारण्यासाठी असलेली स्कॅनर मशीन, आयफोन, डिव्हीआर, मॉनिटर व इतर साहित्य असा एकुण किंमती अंदाजे ७७,५००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूध्द पोलीस ठाणे सदर येथे कलम १४३(२) भा.न्या.सं., सहकलम ३,४,५,७ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, आरोपी महीलेस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, मा. सहा. पोलीस आयुक्त (परि.क्र. २), श्री. शिवाजी गायकवाड सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. ज्ञानेश्वर भेदोडकर, पोउपनि. निकेतन किल्लेदार व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे लकडगंज :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १५.१०.२०२६ चे १२.२५ वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना गंगाजमुना, सिमेंट रोडवरील कमल पानठेला जवळ एक ईसम संशयीतरित्या दिसुन आल्याने, त्याचेकडे जात असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव यश शंकर बन्सोड, वय २० वर्षे, रा. कापूर कॉलोनी, वार्ड क्र. १३, तह. सौंसर, जि. पांढुर्णा (म.प्र.), ह.मु.— शंकर किराणाजवळ, शिवशक्ती बारमागे, कळमना, नागपूर असे सांगीतले. त्याची अंग झडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आंत एक लोखंडी चाकु किंमती २००/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगून समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे पोअं. सुरज दिनेश मडावी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि. दिपक पोफडे यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे बजाजनगर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १५.१०.२०२६ चे १६.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचा भाऊ नामे आदित्य टिकाराम मातवारे, वय २० वर्षे, रा. गोंडवाना नगर, वार्ड नं. १६, चिंचगड रोड, देवरी, जि. गोंदिया, ह.मु.— वानाडोंगरी, नागपूर हा त्याचा मित्र नामे मनिष कुर्जेकर रा. पवनी, भंडारा याचेसह डबलसिट त्याचे टिव्हिएस ज्युपिटर मोपेड क्र. एम.एच. ३६ ए एस ७४४१ ने कॉलेजला जात असतांना, पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीतील, एलएडी मेट्रो स्टेशन ते अंबाझरी रोडवरील मेट्रो पिल्लर क्र. २१२ जवळ, आदित्य चालवित असलेल्या मोपेडला दुसऱ्या एका अनोळखी दुचाकी चालकाने त्याचे ताब्यातील दुचाकी भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन, फिर्यादीचे भावाचे मोपेडला धडक देवून घटनास्थळावरून पळून गेला. अपघातामध्ये फिर्यादीचे भावाचे डोक्याला व छातीला मार लागुन गंभीर जखमी तसेच, मागे बसलेला त्याचा मित्र मनिष किरकोळ जखमी झाला. लोकांनी दोन्ही जखमी यांना उपचाराकरीता ओक्हार्ट हॉस्पीटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी आदित्य यास तपासून मृत घोषीत केले. जखमी मनिषचा उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी तुषार टिकाराम मातवारे, वय २३ वर्षे, रा. ह.मु.—हॉस्टेल नं. ०५, स्पार्टन्स, मेडीकल कॉलेज, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे मसपोनि. जयश्री गिरे यांनी अनोळखी दुचाकी चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१, १२५(अ),१२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**